MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Issue-43, Vol-07, July to Sept. 2022

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept. 2022
Issue 43, Vol-07

Date of Publication
01 August 2022

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
01 August 2022

# Vidyawarta™

International Multilingual Research Journal

www.विद्यावार्ता.कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 8.14 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • Certified Quality Management System • ISO 9001:2015 • International Multilingual Research Journal

http://www.printingarea.blogspot.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**
Dr Gholap Bapu Ganpat
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**
saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**
Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- MISS. VARSHA ANILRAO TIDKE
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr Trushna S Kalambe**
66 Ayodhyanagar behind
sai Mandir lane no 2 Nagpur-440024

- **Dr. Ambhore Shankar**
Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Sumit Prasad**
Professor Colony, Kankarbagh,
PO – Lohia Nagar,Patna – 800 020 (Bihar)
prasadsumit78@gmail.com

- **Prof. Surwade Yogesh p**
Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr. Varma Anju**
Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**
Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

July To Sept. 2022
Issue-43, Vol-07



# INDEX

01) डॉ. अम्बेडकर: भारतीय संविधान और सामाजिक न्याय
डॉ. कौशलेन्द्र वर्मा, इंदौर (म.प्र.) ||08

02) पूर्वी उत्तर प्रदेश के उच्चतर माध्यमिक स्तर के विद्यार्थियों के मानसिक स्वास्थ्य ...
प्रदीप कुमार यादव & डॉ. पुर्णेश नारायण सिंह, खलीलाबाद ||13

03) सामाजिक नेटवर्किंग साइट्स का उच्च शिक्षा के शिक्षार्थियों के समायोजन स्तर के ...
श्वेता शर्मा & डॉ. सुरक्षा बंसल, मेरठ, भारत ||17

04) विषय संदर्भ पाठ्य सहगामी क्रियाओं के विकास से उच्चतर माध्यमिक विद्यालय ...
श्यामसुन्दर श्रीवास्तव & डॉ. मनीषा पाण्डे, गुना (म.प्र.) ||23

05) अहिवंतगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व
प्रा. डॉ. जाधव नितीन साहेबराव, जि. नाशिक ||26

06) किशोर छात्रों के आत्मविश्वास और शैक्षणिक समायोजन पर संमोहन तंत्र का प्रभाव
प्रा. डॉ. व्ही. एन. रामटेके, ऐनपूर ||32

07) कबीर दास एक समाज सुधारक
डॉ. विभा मिश्रा, दादरी ||34

08) COLLABORATIVE TRAUMA A RELATIVE STUDY OF KHUSHWANT SINGH'STRAIN ...
Dr. Mukesh Bhesaniya, Dist. Jamnagar, Gujrat ||39

09) Aloe vera: From Ancient Egyptians to Modern Day Medicinal .....
Beenu Singh Chauhan, Albha tiwari, Gwalior ||45

10) METABOLIC IMBALANCES DURING MENOPAUSE: A SHORT REVIEW
Vikas Kumar Dagur, Jaipur ||51

11) Problem of Child Labour in India: An Analysis
Dr. Roli Prakash, Dr. Rangoli Chandra, Lucknow ||56

12) A STUDY ON CAUSES OFMALNUTRITION AMONG TEENAGE GIRLS
Anjali basediya, Dr. Albha tiwari, Dr. Amita tiwari, Beenu Singh Chauhan ||63

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com



CamScanner

तथा विद्यालय के भावनात्मक उन्नयन का विकास होता है जिससे उनकी शैक्षिक उपलब्धि उच्च होती है।

**सुझाव :**

१. पाठ्य सहगामी क्रियाओं में विद्यार्थियों को रुचि लेना चाहिये जिससे उनमें अच्छे नागरिक बनने के गुण विकसित हो सकें।

२. पाठ्य सहगामी क्रियाओं में शामिल होकर छात्र अपने गुणों का विकास करके समाज में अपना स्थान बना सकता है।

३. पाठ्य सहगामी क्रियाओं को क्रियान्वित करने का कार्य मात्र एक व्यक्ति का नहीं है उसमें सभी लोगों का प्रोत्साहन एवं सहयोग अपेक्षित होता है। अत: संबंधितों छात्रों के हित के लिए सहयोग करना चाहिए।

४. समय–समय पर पाठ्य सहगामी क्रियाऐं कराना चाहिये जिससे विद्यार्थियों में पारस्परिक सहभागिता का विकास होता है।

**संदर्भ सूची**

गुप्ता, एस.पी. (१९९७). सांख्यिकी विधियाँ, शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद।

माथुर, डॉ. एस.एस. (१९७३). शिक्षा मनोविज्ञान, आगरा : विनोद पुस्तक मन्दिर, १९७३.

त्रिपाठी, प्रो. मधुसूदन (२००७). शिक्षा दर्शन और मनोविज्ञान का शब्दकोश, खण्ड–५ बाल विकास, ओमेगा पब्लिकेशन्स, दिल्ली।

अनीता चावला (१९८९–९०). उपलब्ध सुविधाओं का तुलनात्मक अध्ययन : जिला पंचकुला के सरकारी एवं गैर–सरकारी प्राथमिक विद्यालयों में पाठ्य सहगामी क्रियाओं का अध्ययन।

शर्मा, आर.ए. (२००६). शिक्षा अनुसन्धान, मेरठ : आर. लाल. बुक डिपो।

दुबे, डॉ. सत्यनारायण (२०००). अध्यापक शिक्षा इलाहाबाद : शारदा पुस्तक भवन।

⌘⌘⌘

**05**

# अहिवंतगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

**प्रा.डॉ. जाधव नितीन साहेबराव**
एम.ए. सेट. नेट.एम.फिल्. पीएच. डी.,
ता. चांदवड, जि. नाशिक

**********

**अहिवंतगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व**

**प्रास्ताविक :-**

सातमाळ डोंगररांगेतील आकाराने सर्वात मोठा असलेला अहिवंतगड किल्ला ऐतिहासिक दृष्ट्याही तितकाच महत्त्वाचा किल्ला आहे. म्हणूनच स्वत: छत्रपती शिवाजी महाराज हे आपले बंधू व्यंकोजीराजे यांना लिहिलेल्या पत्रात अहिवंतगडाविषयी लिहितात की, अहिवंत म्हणजे जैसा काही पन्हाळा, त्याचे बरोबरी समतुल्य आहे. याचप्रमाणे कवी जयराम पिंडे आपल्या पर्णालपर्वतग्रहणाख्यान या संस्कृत काव्य ग्रंथात शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे यांना उद्देशून म्हणतो, अहिवंतगड व अचलागड नावाचे सुंदर व अजिंक्य किल्ले देखील आपले वडील बंधू जे शिवाजी महाराज त्यांनी काबीज केले. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांचे अमात्य रामचंद्रपंत आपल्या आज्ञापत्रात म्हणतात, साल्हेरी अहिवंतापासून कावेरीतीरापर्यंत निष्कटंक राज्य संपादिले. इसवी सन १६७१ मध्ये अहिवंतगडाला मोगलांनी वेढा घातलेला असताना मोगलांचा अधिकारी भीमसेन सक्सेना आपल्या तारिखे दिल्कुशा ग्रंथात लिहितो, अहिवंताचा किल्ला म्हणजे गगनला भिडल्यासारखा, तो सर होईन हे बुद्धीला पटेना. अशाप्रकारे शत्रू पक्षाकडून प्रशंसा मिळविणारा किल्ला म्हणजे अहिवंतगड होय. पुढे इसवी सन १८१८ मध्ये अहिवंतगड किल्ला जिंकणारा इंग्रज लष्करी अधिकारी कॅप्टन जॉन ब्रिग्ज याने अहिवंतगडाला विशाल व आकारहीन किल्ला संबोधले होते. वरील ऐतिहासिक संदर्भ अहिवंतगडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगण्यास पुरेसे आहेत. विशेष म्हणजे पन्हाळा व साल्हेर यांसारख्या इतिहास प्रसिद्ध किल्ल्यांच्या बरोबरीने अहिवंतगडाचा येणारा उल्लेख म्हणजे या किल्ल्याचा गौरवच म्हणता येईल.

**अहिवंतगड किल्ल्याचे भौगोलिक स्थान :-**

अहिवंतगड किल्ला सातमाळ डोंगररांगेच्या पश्चिमेकडील टोकाजवळ उत्तर अक्षांश २०.४१ ते पश्चिम रेखांश ७३.८६ वर स्थित आहे. हा किल्ला गिरिदुर्ग प्रकारातील असून त्याची समुद्र सपाटीपासूनची उंची १२२३ मीटर (४०१२ फूट) इतकी आहे.१



CamScanner

अहिवंतगड किल्ल्याच्या पश्चिमेला अचला हा किल्ला असून पूर्वेला मोहनदर, मार्कंडेय व रवळा-जवळा हे किल्ले आहेत. याचबरोबर अहिवंतगडाच्या पूर्व दिशेला सप्तश्रृंगी हा धार्मिकदृष्ट्या प्रसिद्ध डोंगरगड आहे. एकूणच खानदेश आणि दख्खन यांच्या सीमेवर असल्यामुळे अहिवंतगडाचे भौगोलिक स्थान अत्यंत महत्त्वाचे होते.

अहिवंतगड किल्ल्याची निर्मिती कोणत्या राजसत्तेच्या काळात झाली, याबाबत निश्चित माहिती उपलब्ध नाही. असे असले तरी, या किल्ल्याचे मोक्याचे भौगालिक स्थान, किल्ल्यावरील स्थापत्य अवशेष तसेच इसवी सनाच्या नवव्या शतकात अहिवंतगडाच्या जवळच असलेल्या मार्कंडेय किल्ल्यावर राष्ट्रकूट सम्राट तिसरा गोविंद याची असलेली राजधानी या सर्व संदर्भांचा विचार करता, अहिवंतगड किल्ल्याची निर्मिती राष्ट्रकूट अथवा त्यानंतरच्या यादव काळात झाली असण्याची शक्यता वाटते.

अहिवंतगड किल्ला नाशिक या जिल्ह्याच्या ठिकाणापासून उत्तर दिशेला ५५ कि.मी. अंतरावर स्थित असून, या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी नाशिक येथून दिंडोरी, वणी मार्गे सप्तश्रृंगी गडाजवळील दरेगाव या गावी जावे लागते. दरेगाव गावातून अहिवंतगडावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक मार्ग पूर्व टोकाकडून तर दुसरा उत्तर टोकाकडील आहे. याशिवाय वणी येथून बिलवाडी या गावी जावून बिलवाडी गावातूनही अहिवंतगडावर चढाई करता येते.२

अहिवंतगड किल्ल्यावर विपुल प्रमाणात स्थापत्य अवशेष असून सद्यःस्थितीत अस्तव्यस्त पडलेले हे सर्व स्थापत्य अवशेष आपल्या अस्तित्वाची अखेरची लढाई लढत आहेत. या किल्ल्याच्या विस्तीर्ण पठारावर वेगवेगळ्या इमारतींचे जोते, घडीव दगड व चिरे मोठ्या प्रमाणात असून हे दगड व चिरेसुद्धा अनमोल ऐतिहासिक ठेवाच आहेत. या दगड अवशेषांचा विचार करता मध्ययुगीन कालखंडात अहिवंतगडावर मोठी लोकवस्ती होती, हे खात्रीने सांगता येते. याचबरोबर अहिवंतगडाच्या मुख्य पठारावर इतरही ऐतिहासिक अवशेष असून यामध्ये उघड्यावरील हनुमान तसेच देवीची मूर्ती, घोड्यावर बसलेले स्त्री-पुरुष शिल्प, दगडांनी बांधलेली घुमटी यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. अहिवंतगडाच्या उत्तर व दक्षिण कड्यांमध्ये गुहा खोदलेल्या असून या गुहा आजही सुस्थितीत आहेत.३ याचबरोबर अहिवंतगडाच्या पठारावर पाण्याचे तीन तलाव व चार टाकी असून यापैकी पठारावरील टेकडीच्या शेजारील टाक्याला बाळंतीणीचे टाके म्हणतात. या टाक्यातील पाण्याने आंघोळ केल्यास त्वचा आजारांपासून मुक्ती मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे. वरील अवशेषांबरोबरच भग्न दरवाजे, ढासळलेली तटबंदी व इतरही ऐतिहासिक अवशेष अहिवंतगडावर दिसून येतात.४

**अहिवंतगड किल्ल्याचे विविध नावे:-**

अहिवंतगड किल्ल्याला ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये विविध नावांनी संबोधलेले दिसून येते. मध्ययुगीनकालीन ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये या किल्ल्याचा उल्लेख हनुमंतगड, हणवंत्या असाही येतो. काही कागदपत्रांमध्ये अहिवंतगड, हनुवंतगड असाही उल्लेख आढळतो. याचबरोबर स्थानिक लोक या किल्ल्याचा उल्लेख सर्पकिल्ला असा करतात. याचे कारण म्हणजे अहिवंतगडाच्या डोंगरसोंडा अष्टदिशांना लांबचलांब पसरलेल्या असल्यामुळे त्याला सर्पकिल्ला हे नाव मिळाले आहे. याचबरोबर १६७१ साली मोगलांनी अहिवंतगडाला वेढा दिलेला असताना, मोगल सरदार दाऊदखान कुरेशी याच्याकडील ज्योतीषाने अहिवंतगड किल्ल्याची साखरेपासून प्रतिकृती तयार केली होती. त्यामुळे या किल्ल्याला साखरेचा किल्ला असेही म्हटले जाते.५

**अहिवंतगड किल्ल्याचा बहामनीकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

पंधराव्या शतकात बहामनी सत्तेचे अहिवंतगडावर वर्चस्व असताना इसवी सन १४७८ मध्ये सरदार गणपतराव जनार्दन हा या भागाचा प्रमुख होता. याकाळात वणी हे गाव अहिवंतगडाच्या पायथ्याशी होते. परंतु अहिवंतगडावरून होणाऱ्या तोफांच्या माऱ्यामुळे पायथ्याच्या वणी गावात जीवितहानी व वित्तहानी होत असे. त्यामुळे गणपतराव जनार्दन याने वणी गाव अहिवंतगडाच्या पायथ्यापासून दूरवर म्हणजेच हल्ली असलेल्या ठिकाणी वसविले.६ पुढे इसवी सन १४९० मध्ये बहामनी सत्तेच्या विघटनानंतर अहमदनगरची निजामशाही सत्ता स्थापन झाली व अहिवंतगड या निजामशाहीच्या वर्चस्वाखाली गेला. पुढे इसवी सन १६३६ पर्यंत या किल्ल्यावर अहमदनगरच्या निजामशाहीचे वर्चस्व राहिले.

**अहिवंतगड किल्ल्याचा शिवपूर्वकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इसवी सनाच्या सोळाव्या शतकापासून सातमाळ डोंगररांगेचा परिसर अहमदनगरच्या निजामशही सत्तेच्या वर्चस्वाखाली होता. त्यानुसार इसवी सन १४९० पासून अहिवंतगड किल्ल्यावरही अहमदनगरच्या निजामशाही सत्तेचे वर्चस्व होते. पुढील काळात इसवी सन १६२६ मध्ये मोगल बादशाह शहाजहान याने अहमदनगरची निजामशाही राजवट जिंकून घेण्यासाठी प्रचंड मोहीम काढली. निजामशहाचे प्रमुख सरदार असलेले शहाजीराजे भोसले हे निजामशाही वाचविण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु मोगलांची लष्करी ताकद प्रचंड होती. दरम्यान इसवी सन १६३६ च्या सुमारास मोगल सेनापती शयिस्तेखान याचा प्रमुख सरदार अलवर्दीखान याने सातमाळ डोंगररांगेतील किल्ले जिंकण्यासाठी तीव्र मोहीम सुरू केली. मार्च इसवी सन १६३६ मध्ये अलवर्दीखानाने चांदवडच्या किल्ल्याला वेढा देऊन हा किल्ला जिंकून घेतला.यानंतर अलवर्दीखानाने इंद्राई व इतर किल्ले त्या-त्या किल्ल्यांच्या किल्लेदारांना लाच व मनसब देऊन हस्तगत केले.याच पद्धतीने अलवर्दीखानाने अहिवंतगड किल्लाही अहमदनगरच्या निजामशाही सत्तेकडून इसवी सन १६३६ मध्ये हस्तगत केला. याबाबतचा उल्लेख इंद्राई, राजदेर व धोडप या किल्ल्यांवरील शिलालेखांमध्ये आढळून येतो.७



CamScanner

**अहिवंतगड किल्ल्याचा शिवकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इसवी सन १६६९ पासून छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगल सत्तेविरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारले. त्यानुसार इसवी सन १६६५ च्या पुरंदरच्या तहात मोगलांना दिलेला प्रदेश व किल्ले पुन्हा जिंकून घेण्याबरोबरच मोगलांचा प्रदेश व किल्लेही जिंकून घेण्याचे धोरण छत्रपती शिवाजी महाराजांनी आखले होते. दरम्यान,इसवी सन १६७० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत ह्या मोगलांच्या श्रीमंत शहराची दुसऱ्यांदा लूट केली. यावेळी परतीचा प्रवास करीत असताना मोगल सरदार दाऊदखान कुरेशी याने शिवाजी महाराजांना चांदवडजवळील कांचना किल्ल्याच्या परिसरात रोखले. यावेळी शिवाजी महाराजांनी दाऊदखानाचा पराभव केला व सुरतहून मिळविलेली लूट सुरक्षितपणे राजगडाकडे रवाना केली.८ कांचना युद्धातील विजयानंतर शिवाजी महाराजांनी सातमाळ डोंगररांगेतील रवळाजवळा, मार्कंडेय, अचला व इतर किल्ले मोगलांकडून जिंकून घेतले. याचवेळी मराठ्यांचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांनी अहिवंतगड किल्ला मोगलांकडून जिंकून घेतला.९

सुरत शहराची दुसऱ्यांदा झालेली लूट याचबरोबर कांचन युद्धातील पराभव तसेच सातमाळ डोंगररांगेतील रवळा-जवळा, मार्कंडेय व अचला या किल्ल्यांबरोबरच अहिवंतगडासारखा मोक्याचा किल्ला मराठ्यांनी हस्तगत केल्याचे समजताच मोगल बादशाहा औरंगजेब याला मोठा धक्का बसला. औरंगजेब बादशाहाने त्वरित बऱ्हाणपूरला छावणी करून असलेला मोगल सेनापती महाबतखान याला अहिवंतगड व सातमाळ डोंगररांगेतील मराठ्यांनी जिंकलेले इतर किल्ले पुन्हा हस्तगत करण्याचा आदेश दिला. बादशाहाचा आदेश मिळताच महाबतखान बऱ्हाणपूरहून चांदवडकडे निघाला. १० जानेवारी १६७१ रोजी तो औरंगाबादला पोहोचला. तेथे त्याने शाहजादा मुअज्जमची भेट घेतली व पुढील रणनीतीवर विचारविनिमय केला. यानंतर तो औरंगाबादहून चांदवडकडे रवाना झाला.चांदवडला मोगलांची प्रमुख लष्करी छावणी होती.पाच हजारी मनसबदार दाऊदखान कुरेशी या छावणीत ससैन्य मुक्काम करून होता. जानेवारी १६७१ च्या शेवटच्या आठवड्यात महाबतखान चांदवडला पोहोचला. याचठिकाणी दाऊदखान व महाबतखान यांची भेट झाली. छत्रपती शिवाजी महाराजांविरुद्ध पराभव पत्करावा लागलेल्या दाऊदखानाची महाबतखानाने कानउघडणी केली असता दाऊदखान नाराज झाला. दरम्यान महाबतखानाने सातमाळ डोंगररांगेतील मराठ्यांनी जिंकलेले किल्ले पुन्हा जिंकण्यासाठीची योजना तयार केली. त्यानुसार अहिवंतगड किल्ला जिंकण्याला प्राधान्य देण्यात आले. ठरलेल्या योजनेनुसार महाबतखानाने अहिवंतगडाकडे कूच केली. सोबत दाऊदखान कुरेशीही होता. तसेच इतर अनेक मातब्बर सरदारही साथीला होते. यामध्ये राजा रायसिंग सिसोदिया, मिर्झा राजे जयसिंग याचा मुलगा कुवर किशनसिंग, सुजानसिंग, शुभकर्ण बुंदेला, रावकर्ण याचा मुलगा राजा अनुपसिंग राठोड, आघारखान, तुर्कताजखान इत्यादी सरदारांचा समावेश होता.

जानेवारी इसवी सन १६७१ च्या अखेरीस मोगलांची प्रचंड फौज अहिवंतगडाच्या पायथ्याला येऊन पोहोचली. लगेचच मोगल सैन्याने अहिवंतगडाला वेढा घालून नाकेबंदी केली व गडावरील रसद संपण्याची वाट पाहू लागले. महाबतखानाने अहिवंतगडाच्या दक्षीण बाजूला असलेल्या प्रवेशद्वाराकडून आक्रमण सुरू ठेवलेले होते, तर दाऊदखान कुरेशी उत्तर बाजूच्या बुरुजाकडून तोफा व बंदुकांनी तीव्र मारा करीत होता. अहिवंतगडावरून मराठ्यांची शिबंदीही या दोन्ही बाजूंच्या आक्रमणाला तोडीस-तोड उत्तर देत होती. दरम्यान, मोगलांनी वेढा देऊन एक महिना झाला तरी अहिवंतगड हाती येण्याची कुठलेही चिन्ह दिसत नव्हते. अशावेळी दाऊदखान कुरेशी याने आपल्या छावणीतील ज्योतिषाला किल्ला कधी हाती येईल म्हणून विचारले. तेव्हा ज्योतिषाने थोडी साखर मागविली व या साखरेने जमिनीवर अहिवंतडाचा नकाशा काढला. तसेच ज्या ठिकाणी बुरूज होते, त्याठिकाणी साखरेचे लहान-लहान ढिगारे रचले. गडावरील मराठा सैन्याच्या व गडाभोवतालच्या मोगल सैन्याच्या जागाही साखरेनेच तयार केल्या. अशाप्रकारे साखरेपासून अहिवंतगडाची लहानशी प्रतिकृती तयार झाली. यानंतर ज्योतिषाने आपल्या पासोडीत असलेल्या डबीतून एक मुंगळा बाहेर काढला. हा मुंगळा ज्योतिषाने अहिवंतगडाच्या साखरेच्या प्रतिकृती जवळ सोडला. मुंगळा प्रथम महाबतखानाच्या मोर्चाकडे गेला. त्यानंतर तटावरून फिरला व दाऊदखानाच्या मोर्चाकडे आला व नंतर बाहेर आला. असे दोन-तीन वेळा घडले.यानंतर ज्योतिषाने मुंगळा पुन्हा डबीत ठेवला व हिशेब मांडायला सुरूवात केली. सर्व हिशेब व आकडेमोड झाल्यानंतर ज्योतिषाने सांगितले की, अहिवंतगडावर महाबतखानाच्या बाजूने जोरदार हल्ला होईल, परंतु सहा दिवसांनी दाऊदखानाच्या बाजूने किल्ला मोगलांच्या ताब्यात येईल. ज्योतिषाच्या या भविष्यवाणीबाबत दाऊदखान कुरेशीच्या छावणीतील अधिकारी भीमसेन सक्सेना म्हणतो, अहिवंताचा किल्ला म्हणजे गगनाला भिडल्यासारखा होता. तो सर होईल ही गोष्ट बुद्धीला पटेना.

दरम्यान, महाबतखानाने अहिवंतगडावर जोरदार आक्रमण सुरू केले. किल्ल्यावरील रसदही दिवसागणिक कमी होत होती.त्यामुळे किल्ल्यावरील मराठा शिबंदीचा धीर खचत चालला होता. अखेर किल्ल्यावरील मराठा अधिकाऱ्यांनी दाऊदखानाशी बोलणी सुरू केली. यावेळी किल्ल्यावरील मराठ्यांचे अधिकारी व दाऊदखान यांच्यात तोंडी करार होऊन मराठा शिबंदीने अहिवंतगड दाऊदखानाच्या ताब्यात सोपविला. त्याबदल्यात दाऊदखानाने मराठा शिबंदीला सुखरूप किल्ल्याबाहेर जाऊ दिले. ज्योतिषाने सांगितल्यानुसार बरोबर सहाव्या दिवशी दाऊदखान कुरेशी याच्या मोर्चाच्या बाजूने अहिवंतगड किल्ला मोगलांच्या ताब्यात आला. ही घटना मोगल सरसेनापती महाबतखान याला समजताच त्याला प्रचंड राग आला. कारण महाबतखान हा

दाऊदखानापेक्षा वरिष्ठ सरदार असूनही त्याला विश्वासात न घेता दाऊदखानाने परस्पर किल्ल्यावरील मराठा अधिकाऱ्यांशी तह करून अहिवंतगड हस्तगत केला होता. तसेच हा किल्ला जिंकण्यासाठी महाबतखानाने अधिक श्रम घेतले होते, परंतु किल्ला जिंकण्याचे श्रेय दाऊदखानाला मिळाले. दरम्यान दाऊदखानाने ज्योतिषाला योग्य बक्षीस देऊन त्याचा गौरव केला.१० अहिवंतगडाच्या या वेढ्याच्या प्रसंगी किल्लेदार कोण होता. त्याच्या हाताशी किती सैन्य होते. याबाबत माहिती उपलब्ध नसणे, हे मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल.११ कदाचित दाऊदखान व किल्ल्यावरील मराठा अधिकारी यांच्यातील गुप्त तहानुसार ही माहिती गुप्त ठेवण्यात आली असावी. दरम्यान, अहिवंतगड किल्ला मोगलांच्या हाती आला असला तरी, महाबतखान व दाऊदखान कुरेशी यांच्यातील अंतर्गत संघर्षामुळे मोगल बादशाहा औरंगजेब संतप्त झाला. त्याने या दोन्ही सरदारांना बादशाहाच्या सेवेत परत बोलविले.१२

इसवी सन १६७० व १६७१ मध्ये काही महिने अहिवंतगड किल्ला स्वराज्यात समाविष्ट झाला होता. परंतु मार्च इसवी सन १६७१ मध्ये मोगलांनी अहिवंतगड पुन्हा जिंकून घेण्यात यश मिळविले. तेव्हापासून इसवी सन १६८० पर्यंत हा किल्ला मोगलांच्याच वर्चस्वाखाली होता. दरम्यान १६८० मध्ये मराठ्यांनी पुन्हा एकदा किल्ला जिंकण्याचे आपले हुकुमी तंत्र अवलंबिले. त्यानुसार रात्री अचानक अहिवंतगडावर हल्ला करून एका रात्रीत हा किल्ला हस्तगत केला. मराठ्यांच्या या पराक्रमाची नोंद मराठा कागदपत्रात नव्हे तर मोगलांच्या फारसी कागदत्रांमध्ये आली आहे. ही नोंद पुढीलप्रमाणे, 'सीवाने मध्यरात्रीनंतर हनुवंतगडावर हल्ला केला, काही लोकांना मारून, काहींना जखमी करून व काहींना कैद करून किल्ला हस्तगत केला.'१३ अहिवंतगडासारखा विशाल किल्ला एका रात्रीत जिंकण्याचा भीम पराक्रम छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे मावळेच करू शकत होते. याचप्रकारे मराठ्यांनी यापूर्वी सिंहगड, पन्हाळा व इतरही किल्ले एका-एका रात्रीत जिंकून दाखविले होते. तात्पर्य मराठ्यांना एका रात्रीत किल्ला जिंकण्याचा अनुभव होता, तर मोगलांना एका रात्रीत किल्ला गमविण्याचा.

फेब्रुवारी इसवी सन १६८० मध्ये अहिवंतगड किल्ला मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आला. यानंतर काही दिवसातच मराठा स्वराज्याला हादरवून सोडणारी घटना घडली. ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे रायगड किल्ल्यावर अल्प आजाराने दुर्दैवी निधन झाले. यानंतर स्वरराज्याच्या राजकारणात महाराणी सोयराबाई व युवराज संभाजी यांच्यात अंतर्गत संघर्ष सुरू झाला.१४ या संघर्षाचा फायदा मोगलांनी घेतला नसता तर नवलच.मोगल बादशाह औरंगजेब याने स्वराज्याचा प्रदेश व किल्ले जिंकण्याची रणनीती आखली. त्यानुसार इसवी सन १६८० मध्ये खानजहान बहादूरशहा कोकलताश याची दिलेरखानाच्या जागेवर दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. लगचेच जून १६८० मध्ये बहादूरखानाने अहिवंतगड किल्ला मराठ्यांकडून जिंकून घेण्यासाठी या किल्ल्याला वेढा दिला.१५ परंतु मराठ्यांनी बहादूरखानाला तीव्र प्रतिकार करण्याची तयार केली होती. तसेच छत्रपती संभाजी राजांनी बहादूरखानाशी उघड लढाई करण्याची तयारी केली व बहादूरखानाला तसे आव्हानही दिले.१६ दरम्यान पावसाळाही सुरू झाला होता. अहिवंतगडासारख्या विशाल किल्ल्याचा वेढा पावसाळ्यात कायम ठेवणे अत्यंत कठीण काम होते. त्यामुळे बहादूरखानाने अहिवंतगडाचा वेढा उठविला व तो धोडप किल्ल्याकडे रवाना झाला. यानंतर जुलै १६८० मध्ये मोगल बादशहा औरंगजेब याने रणमस्तखान या मोगल सरदाराला चार हजार सैन्यासह अहिवंतगड जिंकण्यासाठी पाठविले. पावसाळा असतानाही रणमस्तखानाने अहिवंतगडाला वेढा दिला.१७ परंतु त्यालाही हा बलाढ्य किल्ला जिंकण्यात अपयश आले. तेव्हा त्यालाही मोगल दरबाराकडून माघारी बोलविण्यात आले. यानंतर इसवी सन १६८२ मध्ये कांचना, रवळा-जवळा व अहिवंतगड या सर्व किल्ल्यांच्या परिसरात मोगल व मराठे यांच्यात तीव्र संघर्ष घडून आले. परंतु यावेळीही अहिवंतगड जिंकण्यात मोगलांना यश आले नाही.१८

इसवी सन १६८० पासून मोगल व मराठे यांच्यात स्वराज्यात प्रदीर्घ संघर्ष चालू होता. याकाळात इसवी सन १६८० व १६८२ मध्ये मोगलांनी अहिवंतगड जिंकण्याचे प्रयत्न केले, परंतु त्यात त्यांना यश आले नव्हते. दरम्यान इसवी सन १६८५ च्या जानेवारी महिन्यात मोगलांनी अहिवंतगड मराठ्यांकडून जिंकून घेतला. याबाबतची नोंद मोगलांच्या दरबारी अखबारातमध्ये आली आहे.१९ परंतु यावेळी मोगलांनी अहिवंतगडासारखा विशाल व बलाढ्य किल्ला कशाप्रकारे जिंकला, याबाबतचे उल्लेख फारसी अथवा मराठी कागदपत्रांमध्ये मिळत नाहीत. एखाद्या मोगल सेनापतीने वेढा घालून स्वपराक्रमाने हा किल्ला जिंकला असता तर, निश्चितपणे त्याबबतची नोंद मोगल दरबाराच्या कागदपत्रांमध्ये मिळाली असती. विशेष म्हणजे याकाळात मोगल सेनापतींनी मराठ्यांचे किल्ले जिंकण्यासाठी फितुरीचा व लाचलुचपतीचा अवलंब केलेला दिसून येतो. याच काळात अंकाई-टंकाईचा किल्लाही मोगलांनी फितुरीने हस्तगत केला होता. तात्पर्य १६८५ मध्ये अहिवंतगडही फितुरी होऊन मोगलांच्या ताब्यात गेला असावा, असे खात्रीने म्हणता येईल.

जानेवारी १६८५ मध्ये मराठ्यांकडून हस्तगत केलेल्या अहिवंतगड किल्ल्यावर मोगल दरबाराने मतहूम बहादूरखान याचा मुलगा दिलेर याला ठाणेदार नेमले.तो १००० जात व ८०० स्वार, पैकी २०० दुघोडी स्वार असा मनसबदार होता. याअगोदर त्याचे ५०० जात व २०० स्वार कमी करण्यात आले होते, ते पुन्हा सशर्त वाढविण्यात आले. याचबरोबर दिलेर याने आपल्या स्वारांमध्ये कैलासवासी बजाजी निंबाळकर व खानजहान बहादूरच्या फौजेतील स्वार नेमावे असा हुकूम देण्यात आला.२०



CamScanner

अहिवंतगड किल्ला मोगलांच्या ताब्यात जाऊन काही दिवसच झाले होते, तोच फेब्रुवारी १६८५ मध्ये मराठ्यांची एक फौज अहिवंतगडावर चालून गेली. यावेळी चांदवडचा ठाणेदार मराठा सेनेला रोखण्यासाठी त्वरित अहिवंतगडाजवळ पोहोचला.याप्रसंगी मोगल व मराठा सैन्यात किरकोळ लढाई होऊन दोन्ही सैन्यांनी माघार घेतली.या लढाईत मराठ्यांचे तीस सैनिक मारले गेले तर सतरा सैनिक कैद झाले.तसेच मोगलांना काही प्रमाणात लष्करी सामान मिळाले. मोगलांचीही काही प्रमाणात हानी झाली. अहिवंतगडावर मोगलांचे वर्चस्व मात्र कायम राहिले.२१

इसवी सन १६८५ पासून अहिवंतगडावर दीर्घकाळ मोगलांचे वर्चस्व कायम होते. याकाळात मोगल व मराठे यांच्यातील रणक्षेत्र पश्चिम महाराष्ट्र व कर्नाटकचा प्रदेश असल्याने सातमाळ डोंगररांग तसेच अहिवंतगडाच्या परिसरात विशेष हालचाली झाल्या नसाव्यात. दरम्यान इसवी सन १६९८ मध्ये छत्रपती राजाराम कर्नाटकातील जिंजी किल्ल्याहून स्वराज्यात परत आले. स्वराज्यात येताच त्यांनी मोगलांविरुद्ध आक्रमक धोरण अवलंबिले. त्यानुसार फेब्रुवारी १६९९ मध्ये मराठा सैन्याने अहिवंतगडाच्या पायथ्याशी छावणी करून सभोवतालच्या परिसरावर नियंत्रण प्रस्थापित केले. यावेळी मराठ्यांनी अहिवंतगड मोगलांकडून जिंकून घेण्याची निश्चित शक्यता होती. दरम्यान मोगल ठाणेदार दौलतमंदखान तसेच सरदार तरबियतखान व राजा मोहनदास यांनी आक्रमण करून मराठ्यांची अहिवंतगडाजवळीत छावणी उठविली.२२ त्यामुळे हा किल्ला मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आणण्याची एक मोठी संधी हुकली. इसवी सन १७०० नंतर अहिवंतगड किल्ल्यावर विशेष ऐतिहासिक घटना घडल्याचे उल्लेख मिळत नाहीत. काही प्रशासकीय बदलांचे उल्लेख मात्र मिळतात. त्यानुसार इसवी सन १७०३ च्या सुमारास कदीम कुलीखान हा अहिवंतगडाचा किल्लेदार होता. दरम्यान, त्याची बदली करून त्याच्या जागी रहमानदाद याला अहिवंतगडाचा किल्लेदार नेमण्यात आले.२३

एकूणच शिवकाळात अहिवंतगड किल्ला आपापल्या वर्चस्वाखाली ठेवण्यासाठी मोगल व मराठे यांच्यात तीव्र संघर्ष घडून आले. यामध्ये कधी मोगलांचा तर कधी मराठ्यांचा विजय झाला. अठराव्या शतकापासून मात्र या किल्ल्यासाठी विशेष संघर्ष झाले नाही.

**अहिवंतगड किल्ल्याचा पेशवेकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इसवी सन १७२३ पर्यंत सातमाळ डोंगररांग तसेच अहिवंतगड किल्ल्यावर मोगलांचे वर्चस्व कायम होते. दरम्यान १७२३ मध्ये मोगलांचा प्रमुख सरदार निजाम-उल्-मुल्क याने दक्षिणेत हैद्राबाद येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. या राज्यास हैद्राबादची निजामशाही म्हटले जात असे. हैद्राबादच्या निजामशाहीच्या स्थापनेबरोबरच नाशिक बागलाणसह सातमाळ डोंगररांगेचा प्रदेश या सत्तेच्या वर्चस्वाखाली गेला. अशा प्रकारे अहिवंतगड किल्ल्यावर हैद्राबादच्या निजामशहाचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

इसवी सन १७३०-३१ मध्ये पेशवा पहिला बाजीराव व गुजरातमधील मराठा सरदार त्र्यंबकराव दाभाडे यांच्यात गुजरातच्या चौथाई सरदेशमुखीच्या हक्कावरून डभोई येथे युध्द होऊन त्यात पेशवा पहिला बाजीराव याचा विजय झाला. या युध्दात त्र्यंबकराव दाभाडे मारला गेला. त्यामुळे त्र्यंबकराव दाभाडे याची आई उमाबाई दाभाडे हिने चांदवड भागातील पेशव्यांच्या प्रदेशावर हल्ले सुरू केले. इसवी सन १७३४ मध्ये उमाबाईच्या सैन्याने वणी दिंडोरी भागात लुटालूट केली असता, या भागातील पाटील व जमीनदारांनी अहिवंतगड किल्ल्याचा आश्रय घेतला होता.२४

पुढे इसवी सन १७५२ मध्ये पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्या काळात मराठे व निजाम यांच्यात भालकी येथे युद्ध होऊन त्यात निजामाचा पराभव झाला.यावेळी निजाम व मराठे यांच्यात झालेल्या भालकीच्या तहानुसार सातमाळ डोंगररांगेतील चांदवडच्या पश्चिमेकडील सर्व किल्ले मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आले.२५यामध्ये अहिवंतगडाचाही समावेश होता. यानंतर इसवी सन १७५४ मध्ये निजाम व मराठे यांच्यात झालेल्या करारानुसार भालकीच्या तहात मराठ्यांना मिळालेले सातमाळ डोंगररांगेतील किल्ले निजामाला परत देण्यात आले.२६ पुढील काळात इसवी सन १७५७ मध्ये मराठ्यांनी सिंदखेड येथे निजामाचा पराभव करून सातमाळ डोंगररांगेतील सर्व किल्ले पुन्हा आपल्या वर्चस्वाखाली आणले.२७ यानंतरच्या काळात इसवी सन १८१८ पर्यंत अहिवंतगड किल्ल्यावर मराठी सत्तेचे वर्चस्व कायम होते. परंतु पेशवेकाळात गिरिदुर्गांना राजकीयदृष्ट्या विशेष महत्त्व न राहिल्याने जवळपास ६० वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात अहिवंतगड किल्ल्यावर कुठलीही विशेष घटना घडलेली दिसून येत नाही. फक्त काही प्रशासकीय उल्लेख मात्र मिळतात. त्यामध्ये इसवी सन १७६०-६१ मध्ये अहिवंतगडाची जहागीर दादो अनंत यास देण्यात आली होती.२८इसवी सन १७६५ मध्ये मराठ्यांनी माणिकपुंज किल्ला हैद्राबादचा निजामाकडून हस्तगत केला. यावेळी धोडप किल्ल्यावरील महादजी बाबुराव यांनी मोठी कामगिरी बजावली. या कामगिरीचे बक्षीस म्हणून महादजी बाबुराव यास अहिवंतगड किल्ल्याची फडणीशी देण्यात आली.२९ एकूणच शिवकाळात अहिवंतगड किल्ला अवघा सहा वर्षे मराठ्यांच्या वर्चस्वाखाली असूनही याकाळात अनेक महत्त्वाच्या राजकीय घटना या किल्ल्यावर घडल्या. याऊलट पेशवेकाळात जवळपास ६० वर्षे हा किल्ला मराठ्यांच्या वर्चस्वाखाली राहूनही कुठल्याही प्रकारच्या राजकीय घटनेचा उल्लेख मिळत नाही. यावरून शिवकाळ व पेशवेकाळ या दोन्ही कालखंडांमधील गिरिदुर्गांच्या स्थितीची कल्पना येते.

**अहिवंतगड किल्ल्याचा ब्रिटिशकालीन कालखंडाचा ऐतिहासिक आढावा:-**

इसवी सन १८१७-१८ मध्ये इंग्रज व मराठे यांच्यात तिसरे व निर्णायक युद्ध घडून आले.या युद्धात मराठा राज्याचा प्रमुख पेशवा दुसरा बाजीराव याचा पराभव होऊन मराठी सत्तेचा अस्त झाला.यानंतर इंग्रजांनी मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यासाठीचे धोरण निश्चित केले. त्यानुसार नाशिक व बागलाण भागातील किल्ले जिंकून घेण्याची जबाबदारी या भागातील इंग्रजांचा लष्करी अधिकारी कॅप्टन जॉन ब्रिग्ज याच्यावर सोपविण्यात आली. त्यानुसार एप्रिल व मे इसवी सन १८१८ मध्ये कॅप्टन जॉन ब्रिग्ज व इतर इंग्रज अधिकाऱ्यांनी सातमाळ डोंगररांगेतील सर्व किल्ले मराठ्यांकडून जिंकून घेतले. यामध्ये अहिवंतगडाचाही समावेश होता. यावेळी कॅप्टन ब्रिग्ज अहिवंतगडावर पोहोचला असता त्याने या किल्ल्याला विशाल व आकारहीन डोंगर म्हणून संबोधले.३०

मराठ्यांनी सातमाळ डोंगररांगेतील किल्ल्यांच्या आधारे ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड करू नये म्हणून या किल्ल्यांवर जाण्याचे मार्ग तसेच या किल्ल्यांवरील तटबंदी, बुरुज व इमारती नष्ट करण्याचे धोरण ब्रिटिश लष्करी अधिकारी कॅप्टन जॉन ब्रिग्ज व कर्नल हकीन्सन यांनी अवलंबले. त्यानुसार अहिवंतगड किल्ल्याचे प्रवेशमार्ग, तटबंदी, बुरुज व या किल्ल्यावरील इमारती नष्ट करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यासाठी या किल्ल्याचे सर्वेक्षणही करण्यात आले.३१ ब्रिटिशांच्या वरील धोरणानुसार अहिवंतगड किल्ल्यावरील प्रवेश मार्ग, तटबंदी, बुरुज व इमारती हे सर्व नष्ट करण्यात आले.३२ याचबरोबर या वैभवशाली किल्ल्याचे वैभव संपुष्टात येऊन फक्त आठवणी शिल्लक राहिल्या.

**समारोप:-**

अहिवंतगड हा सातमाळ डोंगररांगेतील विशाल आकाराचा किल्ला म्हणून विशेष नावलौकिक असलेला किल्ला होय. याचबरोबर या किल्ल्याचे भौगोलिक स्थान अत्यंत मोक्याची ठिकाणी असल्यामुळे मध्ययुगीन कालखंडात सर्वच राजकीय सत्तांनी हा किल्ला आपापल्या वर्चस्वाखाली ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अहिवंतगडाचा मोठेपणा येथेच संपत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांकडून कौतुक झालेला किल्ला म्हणूनही अहिवंतगडाची वेगळी ओळख आहे.

**संदर्भ सूची**

१) कुलकर्णी, के. के., संपादक, नाशिक जिल्हा गॅझेटिअर, गव्हर्न्मेंट सेन्ट्रल प्रेस, मुंबई, १९९४, पृ. ४०८

२) जाधव, एन. एस., अहिवंतगड किल्ला भेट, दिनांक १४/०८/२०१६

३) तैत्रव;

४) पाटील, पी. के., जेव्हा डोंगर गड बोलू लागतात, सुराकिर्ती प्रकाशन, नाशिक, २०१०, पृ. २९

५) तेंडुलकर, महेश मंगेश, कथा दुर्गांच्या, भाग १, श्री समर्थ प्रकाशन, पुणे, २००२, पृ. १५

६) तैत्रव, पृ. ३०

७) Bendre, V.S., Editor, A Study of Muslim inscriptions, Karnatak Publishing House, Bombay, Page No. 146

८) पगडी, सेतुमाधवराव, शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७१, पृ. ८०

९) Kulkarni G.T., The Mughal Maratha Relations Twenty Five fateful years, Department of history, Deccan College, Pune, Page No. 29

१०) पगडी, सेतुमाधवराव, समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड ३, मोगल आणि मराठे (तारिखे दिल्कुशा), ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. २३६

११) तेंडूलकर, महेश मंगेश, साद शिवकालीन दुर्गांची, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९, पृ. १५८

१२) पगडी, सेतुमाधवराव, समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड ३, मोगल आणि मराठे (तारिखे दिल्कुशा), ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. २३७

१३) खरे, ग. ह., संपादक, ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ६, औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९७२, पृ. ८३

१४) कुलकर्णी अ.रा., खरे, ग. ह., संपादक, मराठ्यांचा इतिहास, खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, १९८४, पृ. ३८०

१५) गोखले, कमल, शिवपुत्र संभाजी, नवकमल प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. २१७

१६) जोशी, श. ना., संपादक, संभाजीकालीन पत्र सार संग्रह, खंड ३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४९, पृ. १०४

१७) खरे, ग. ह., संपादक, ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ६, औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९७२, पृ. ९१

१८) गोखले, कमल, शिवपुत्र संभाजी, नवकमल प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. २३२

१९) खरे, ग. ह., संपादक, ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ६, औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९७२, पृ. ९१

२०) खरे, ग. ह., संपादक, ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ६, औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९७२, पृ. ९१

२१) गोखले, कमल, शिवपुत्र संभाजी, नवकमल प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. २३६

२२) पगडी, सेतुमाधवराव, नियतीच्या विळख्यात औरंगजेब, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, पृ. ७९

२३) पगडी, सेतुमाधवराव, संपादक, मोगल दरबाराची



CamScanner